# <u>विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे कार्यालय</u>

## <u>आ दे श</u>

**<u>क्र. ब-४(१)/५१३/२०२६</u>** **<u>दिनांक : ०१ /०९/२०२६</u>**

**<u>वाचा</u> :-** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनीय पत्र जा. क्र. बी(जन)-५६०१/ ५७/२०२४/१६४५, दिनांक ०५/०९/२०२४

*****

या कार्यालयाच्या आस्थापनेवरील शिपाई पदाचे रिक्त पद भरण्याचे दृष्टीने, मी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती याद्वारे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

सल्लागार समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती द्वारा तयार केलेल्या प्रतिक्षा यादीला मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची मंजुरी मिळाल्याचे अनुषंगाने सदरहू प्रतिक्षा यादीमधील **अनुक्रमांक ०९** प्रमाणे निवड झालेल्या उमेदवाराची शिपाई पदावर तात्पुरत्या स्वरूपात (वेतन मॅट्रिक्स – एस-१, रूपये १५०००-४७६०० अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते) नियुक्ती करण्यात येत असून तिची खालीलप्रमाणे रिक्त असलेल्या पदावर खालील अटी व शर्तीस अधीन राहुन नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव व पत्ता | नियुक्तीचे / नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | **कु. नेहा प्रमोदराव टिक्कस,**<br>रा. वार्ड क्र. १, काटपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती - ४४४ ७०७<br>(शिपाई पदाच्या प्रतिक्षा यादीमधील उमेदवार **अ.क्र. ०९**) | ६वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अमरावती यांचे न्यायालयातील कु. बी. एस. अनासने, शिपाई यांचे रिक्त जागेवर. |

## <u>अटी व शर्ती</u>

**१.** उपरोक्त उमेदवाराची शिपाई पदावरील नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असून सेवा कोणत्याही वेळेस आणि कोणतेही नोटीस अथवा कारण न देता समाप्त करण्यात येईल. तिने तशाप्रकारचे लेखी हमीपत्र विहीत नमुन्यात रूजू होतांना कार्यालयास सादर करावे.

**२.** उपरोक्त उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारणी शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ११ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांचेकडुन वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करावे. त्याकरिता सदरहू नियुक्ती आदेशासोबत उमेदवाराच्या वैद्यकीय तपासणीबाबतचा नमुना जोडलेला आहे. तो तिने पुर्णत्वे भरून रूजू होतेवेळी कार्यालयास सादर करावा.

**३.** उपरोक्त उमेदवाराची शिपाई पदावरील नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असून तिच्याविषयी पोलीस विभागाकडुन चारित्र्य अहवाल प्राप्त होण्याच्या शर्तीनुसार राहील. त्यानंतरच तिची सेवा पुर्ववत करण्यासंबंधी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल. त्याकरिता पोलीस विभागाकडुन अहवाल प्राप्त

करण्यासंबंधी साक्षांकन नमुना यासोबत जोडलेला आहे. तो उमेदवारानी पुर्णपणे भरून घेऊन रूजू होतेवेळी कार्यालयास सादर करावा.

४. उपरोक्त उमेदवाराला कायद्याद्वारे स्थापित भारतीय राज्यघटनेशी असलेल्या निष्ठेबाबतची शपथ रूजू होतांना घ्यावी लागेल.

५. जर तिला राजीनामा द्यावयाचा असेल, तर तिने एक महिन्यापूर्वी नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन शासनाच्या आदेशानुसार शासनाकडे जमा करावे लागेल.

६. वरील नव्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवाराला निर्देशित करण्यात येत आहे की, तिने तिच्या नेमणुकीच्या ठिकाणी **दिनांक ०३/०९/२०२६ रोजीच्या कार्यालयीन वेळेपासून रूजू व्हावे.** जर ती विहीत मुदतीत रूजू होण्यास असमर्थ राहिली तर तिचे नियुक्ती पत्र हे रद्द समजण्यात येऊन तिचे नांव सदरहू निवड/प्रतिक्षा यादीमधुन कमी करण्यात येईल.

७. उपरोक्त उमेदवारानी रूजू होतेवेळी ओळखीकरिता आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवाना, मतदान कार्ड तसेच तिचे मूळ प्रमाणपत्र कार्यालयास साादर करावे. या कार्यालयाने तिच्या मूळ प्रमाणपत्राची पडताळणी केल्यानंतर ते परत करण्यात येईल.

८. उपरोक्त उमेदवाराने तिचे पदाचा विस्तृत कार्यभार रूजू झाल्याबद्दल ताबडतोब घ्यावा.

९. संबंधित कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त उमेदवाराला विहीत नमुन्यात शपथ देऊन तिचेकडुन विहीत नमुन्यातील हमीपत्र प्राप्त करून घ्यावे व ते या कार्यालयास सादर करावे.

**सदरहू आदेश दिनांक ०३/०९/२०२६ रोजीच्या कार्यालयीन वेळेपासून अंमलात येईल.**

01/09/2026
**(उज्वला म. नंदेश्वर)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अमरावती**

पृष्ठांकन क्र./आस्था./३३५९/२०२६
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती
दिनांक : ०१/०९/२०२६

**प्रत अग्रेषित :-**

०१. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती
०२. ६वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती
०३. अधिक्षक, प्रशासन, जिल्हा न्यायालय, अमरावती
०४. सहायक अधिक्षक, आस्था./रो. व वि. विभाग, जिल्हा न्यायालय, अमरावती
०५. कु. नेहा प्रमोदराव टिक्कस, रा. वार्ड क्र.१, काटपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती - ४४४७०७
०६. निवड नस्ती.
माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सादर...

01/9/26
**(उज्वला म. नंदेश्वर)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अमरावती**

# CANDIDATES STATEMENT AND DECLARATION

(The candidate must make the statement required below prior to his Medical Examination and must sign the declaration appointed thereto. His attention is specially directed to the warning sustained in note below)

| | | |
|---|---|---|
| 01 | State your name in full (In BLOCK LETTERS) | |
| 02 | State your age & place of birth | |
| 03 (a) | Have you even had small pox intermittent or any other fever enlargement or suppuration of glands, spitting of blood, asthama, heart disease, lung disease, fainting attacks, rheumatism, appendicitis? | |
| | OR | |
| 03 (b) | Any other disease or accident requiring confirnment to bed and medical or surgical treatment | |
| 04 | When were you last vaccinated ? | |
| 05 | Have you or any of your near relations been affected with consumption, acrofula, goul, asthama, fits, epilepsy or insanity? | |
| 06 | Have your suffered from any from of nervousness due to over work of any other cause? | |
| 07 | Have you been examined and declared unfit for Govt. service by a Medical Officer/ Medical Board, within last 3 years. | |

8 (a) Furnish the following particulars concerning your family

| Father's age if living & state of health | Father's age at death & cause of death | No. of brothers living, their age & state of health | No. of brother dead their age at death & case of death |
|---|---|---|---|
| | | | |

8 (b)

| Mother's age if living & state of health | Mother's age at death & cause of death | No. of sisters living their age & state of health | No. of Sisters dead their age at death & case of death |
|---|---|---|---|
| | | | |

I declare all the above answers to be, to the best of my belief true & correct. I also solemnly affirm that, I have not received a disability certificate/pension or any disease or other condition.

Signature of the candidate

Signed in my presence.

Signature of the Medical Officer

**NOTE** : The candidate shall be held responsible for the accuracy of the above statement. By willfully suppressing any information he/she will suffer the risk of lossing the appointment and, if appointed of forfciting all claim to superannuation pension or gratuity.

## INFORMATION ABOUT HEIGHT, FIGURE AND PERSONAL MARKS

Name :

Designation :

Office :

| Height | Figure | Personal Marks |
|---|---|---|
| ______ft. _____ inch | Slim/Medium | |

Signature of the candidate
( Name of candidate )
Working Place

पे मा पु.-२०,०००-७-२०११-११ '/," X २४"*-(एच) १३
G. C., G. A. D., No. 1062. dt. 5-2-1962 :
शा. प., सा. प्र. वि., क्र. व्हीसीए-१०९२/३०९८/प्र. क्र. ७९/९२/१६-अ, दि. २५-१-१५ ;
शा. प., सा. प्र. वि., क्र. चापज/१००१/प्र. क्र. ११०/२००१/१६-अ, दि. २६-११-२००१ ;
शा. प., सा. प्र. वि., क्र. व्हीसीए-१००३/२३०/१६-अ, दि. ३-३-२००३.]

सर्वसा. २९७ म.इं.
Gen. 297 m.e.

# साक्षांकन नमुना / ATTESTATION FORM

१. इशारा.--या साक्षांकन नमुन्यामध्ये खोटी माहिती पुरविणे किंवा वस्तुस्थितीनिदर्शक माहिती दडपून ठेवणे ही अनर्हता ठरेल आणि त्यामुळे उमेदवार सरकारी नोकरीस अपात्र ठरेल.

1. **Warning**.–The furnishing of false information or suppression of any factual information in the attestation Form would be disqualification and is likely to render the candidate unfit for employment under the Government.

२. हा नमुना पूर्ण केल्यानंतर आणि सादर केल्यानंतर, उमेदवार स्थानबध्द, सिध्ददोष, सेवारोधित इत्यादी झाला असेल तर, यथास्थिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे किंवा यापूर्वी ज्यांच्याकडे साक्षांकन नमुना पाठविला असेल त्या प्राधिकाऱ्याकडे, त्याबाबतचा तपशील तात्काळ कळविला पाहिजे. असे करण्यास कसूर केल्यास वस्तुस्थितीनिदर्शक माहिती दडपून ठेवली आहे असे समजण्यात येईल.

2. If detained convicted, debarred. etc. subsequent to the completion and submission of this form. the details should be communicated, immediately, to the Maharashtra Public Service Commission or the authority to whom the attestation form has been sent earlier, as the case may be. Failure to do sowill be deemed to be suppression of factual information.

३. जर कोणत्याही वेळी एखाद्या व्यक्तीने या साक्षांकन नमुन्यामध्ये खोटी माहिती पुरविली आहे किंवा वस्तुस्थितीदर्शक माहिती दडपून ठेवली आहे असे त्या व्यक्तीच्या सेवाकाळामध्ये निदर्शनास आले तर त्याची सेवा समाप्त होण्यास तो पात्र ठरेल.

3. If the fact that false information has been furnished or that there has been suppression of any factual information in the attestation form, comes to notice at any time, during the service of a person, his service would be liable to be terminated.

---

१. संपूर्ण नाव (ठळक अक्षरात), टोपण नावे असल्यास त्यासह (कोणत्याही वेळी तुम्ही तुमच्या नावातील किंवा आडनावातील कोणताही भाग गाळला असल्यास किंवा त्यात भर घातली असल्यास, त्याचा निर्देश करावा.)

आडनाव    नाव    वडिलांचे नांव

1. Name in full (in block capitals) with aliases, if any (Please indicate if you have added or dropped at any stage any part of your name or surname.)

Surname    Name

२. सध्याचा संपूर्ण पत्ता (म्हणजे गाव, ठाणे व जिल्हा किंवा घर क्रमांक, गल्ली/मार्ग/रस्ता आणि शहर.)

2. Present address in full (i.e. Village. Thana and District or House Number. Lane/Street/Road and Town.)

३. (अ) घराचा संपूर्ण पत्ता (म्हणजेच गाव, ठाणे व जिल्हा किंवा घर क्रमांक, गल्ली/मार्ग/रस्ता आणि शहर.)

3. (a) Home address in full (i.e. Village, Thana and District or House Number. Lane/Street/Road and Town.)

(ब) पाकिस्तानातील मूळ रहिवासी असल्यास, त्या देशातील पत्ता आणि भारतीय संघराज्यात स्थलांतर केल्याचा दिनांक.

(b) If originally a resident or Pakistan, the address in that country and the date of migration to the Indian Union.

४. मागील ५ वर्षात एकावेळी १ वर्षाहून अधिक काळापर्यंत ज्या ठिकाणी तुम्ही राहिला असाल त्या ठिकाणचा तपशील (निवासाच्या कालावधीसह) परदेशात (पाकिस्तानात) वास्तव्य झाले असल्यास, २१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ज्या ठिकाणी १ वर्षाहून अधिक काळापर्यंत राहिला असाल त्या सर्व ठिकाणचा तपशील द्यावा.

4. Particulars of places (with periods of residences) where you have resided for more than one year at a time during the preceding five years. In case of stay abroad (including Pakistan) particulars of all places where you have resided for more than one year after attaining the age of 21 years should be given.

| कालावधी / Period<br>पासून / From पर्यंत / To | संपूर्ण निवासी पत्ता (म्हणजेच गाव, ठाणे व जिल्हा किंवा घर क्रमांक, गल्ली/मार्ग/रस्ता आणि शहर<br>Residential address in full (i.e. Village, Thana and District or House Number, Lane/Street/Road and Town) | मागील स्तंभात उल्लेखिलेल्या ठिकाणच्या जिल्हा मुख्यालयाचे नाव<br>Name of the District Head Quarter of the place mentioned in the preceding Column |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

५. वडीलांचे--(अ) संपूर्ण नाव, टोपण नाव असल्यास त्यासह (अ) ____________
5. Father's–(a) Name in full with aliases if any (a) ____________

(ब) सध्याचा डाक पत्ता (हयात नसल्यास, अखेरचा पत्ता द्यावा) (ब) ____________
(b) Present Postal address (if dead give last address) (b) ____________

(क) घरचा कायम पत्ता (क) ____________
(c) Permanent Home address (c) ____________

(ड) व्यवसाय (ड) ____________
(d) Profession (d) ____________

(इ) सेवेमध्ये असल्यास पदनाम व कार्यालयीन पत्ता द्यावा (इ) ____________
(e) If in service give designation and official address (e) ____________

६. (१) खालील व्यक्तींचे राष्ट्रीयत्व
6. (1) Nationality of–

(अ) वडील (अ) ____________
(a) Father (a) ____________

(ब) आई (ब) ____________
(b) Mother (b) ____________

(क) पती / पत्नी (क) ____________
(c) Housband / Wife (c) ____________

(ड) उमेदवार (ड) ____________
(d) Candidate (d) ____________

(२) पतीचे / पत्नीचे जन्मस्थान ____________
(2) Place of birth of Husband / Wife ____________

७. (अ) निश्चित जन्मदिनांक
7. (a) Exact date of birth

(अ) ______
(a) ______

(ब) सध्याचे वय
(b) Present age

(ब) ______
(b) ______

(क) मॅट्रीक परीक्षेच्या वेळचे वय
(c) Age at Matriculation

(क) ______
(c) ______

८. (अ) जन्मठिकाण, ते जेथे असेल तो जिल्हा व राज्य
8. (a) Place of birth, District and State in which situated.

(अ) ______
(a) ______

(ब) तुम्ही कोणत्या जिल्ह्यातील व राज्यातील आहात ?
(b) District and State to which you belong?

(ब) ______
(b) ______

९. शैक्षणिक अर्हता, वयाच्या १५ व्या वर्षापासून शिक्षणाची ठिकाणे व शाळेतील व महाविद्यालयातील वर्षे यासह.

9. Educational qualification showing place of education with year in schools and colleges since the 15th years of age.

| शाळेचे / महाविद्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता<br>Name of School / College with full address | प्रवेश दिनांक<br>Date of entering | सोडल्याचा दिनांक<br>Date of leaving | उत्तीर्ण परीक्षा<br>Examination passed |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

१०. (अ) जर तुम्ही यापूर्वी नोकरी करीत असाल तर तपशील द्यावा.
10. (a) If you have any time employed, give details

| धारण केलेले पदनाम किंवा कामाचे वर्णन<br>Designation or post held description of work | कालावधी<br>Period | | कार्यालयाचा / भागीदारी संस्था किंवा संस्थेचा पत्ता<br>Full address of the Office / Firm or institution | पूर्वीची नोकरी सोडण्याची संपूर्ण कारणे<br>Full reasons for leaving the previous service |
|---|---|---|---|---|
| | पासून<br>From | पर्यंत<br>To | | |
| | | | | |
| | | | | |

१०. (ब) जर यापूर्वीची नोकरी भारत सरकार/ राज्य शासन/भारत सरकार किंवा राज्य शासन यांच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील उपक्रम/स्वायत्त संस्था/विद्यापीठ स्थानिक मंडळ यामधील असेल तर /ती नोकरी सोडण्याची/किंवा समाप्त होण्याची संपूर्ण कारणे द्या. तुमच्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यात आली होती काय किंवा जेव्हा तुम्ही सेवासमाप्तीची नोटीस दिली त्यावेळी, किंवा त्यानंतर तुमच्या सेवा प्रत्यक्षपणे समाप्त करण्यात येण्यापूर्वी तुम्हाला कोणत्याही बाबतीत तुमच्या वर्तणुकीबद्दल स्पष्टीकरण देण्यासाठी फर्माविण्यात आले होते काय ?

10. (b) If the previous employment was under the Government of India/a State Government/an undertaking owned or controlled by the Government of India or a State Government/ an Autonomous body/ University/Local Body.–Please State fully the reasons for leaving/termination of that appointment. Whether any disciplinary proceedings framed against you or had you been called upon to explain your conduct in any matter at the time you gave notice of termination of service or at a subsequent date before your services were actually terminated ?

११. (अ) तुम्हाला न्यायालयाकडून कोणत्याही अपराधाबद्दल आतापर्यंत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/दंड करण्यात/सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/निवडींना बसण्यास तुम्हाला मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/काढून टाकण्यात आले आहे काय ?

11. (a) Have you ever been arrested/prosecuted/kept under detention, or bound down/fined/convicted by a court of law for any offence or debarred/ disqualified by any Public Service Commission from appearing at its examinations/selections or debarred from taking any examination/ rusticated by any university or any other educational authority/ Instituion ?

११. (ब) हा साक्षांकन नमुना भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/ संस्थेत तुमच्याविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ?

11. (b) Is any case pending against you in any court of law, University or any other educational authority/ Institution at the time of filling up this attestation form ?

११. (क) आपल्या विरुध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी खटला सुरू आहे किंवा कसे, सुरू असल्यास त्याचा तपशील, प्रकरण क्रमांक, कोणत्या न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे, गुन्हा कोणत्या कलमाखाली नोंदविला आहे, इत्यादी.

11. (c) Whether he/she is facing any criminal prosecution in any court and if yes, state the details thereof such as case number, in which court the case is pending under which section etc.

(अ), (ब) किंवा (क) चे उत्तर 'होय' असेल तर हा नमुना भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादींचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरण इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरूप स्पष्ट करावे.

If the answer to (a), (b) or (c) is 'Yes' fill particulars of the case, arrest, detention, fine, conviction, sentence, etc. and the nature of the case pending in the Court/University/Educational authority etc., at the time of filling up this form should be given.

(टीप.--तसेच साक्षांकन नमुन्याच्या सुरूवातीस असलेला '**इशारा**' देखील कृपया पहा.)

(Note.–Please also see the 'Warning' at the top of this Attestation form)

१२. (अ) तुम्ही विवाहित आहात काय ? असल्यास-- (अ) ____________

12. (a) Are you married ? If so- (a) ____________

(ब) तुम्हाला एकापेक्षा अधिक पत्नी आहेत काय ? असल्यास, त्यांची नावे काय आणि तुम्ही त्यांच्याशी केव्हा विवाह केला ? (ब) ____________

(b) Have you more than one wife ? If so, what are their names and when did you marry them ? (b) ____________

(क) तुमच्या पतीस एकापेक्षा अधिक पत्नी आहेत काय ? असल्यास, त्यांची नावे काय आणि त्याने त्यांच्याशी केव्हा विवाह केला ? (क) ____________

(c) Have your husband more than one wife and if so, what are their names and when did he marry them ? (c) ____________

१३. तुमच्या निवास भागातील दोन जबाबदार व्यक्तींची नावे किंवा ज्यांना तुम्ही माहित आहात अशा दोन संदर्भी व्यक्तींची नावे. (१) ____________ (२) ____________

13. Names of two responsible persons of your locality or two references to whom you are known. (1) ____________ (2) ____________

मी असे प्रमाणित करतो की, पूर्ववर्ती माहिती माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे अचूक आणि संपूर्ण आहे. सरकारी नोकरीसाठी असणाऱ्या माझ्या पात्रतेस हानी पोचवील अशी कोणतीही परिस्थिती असल्याचे मला माहित नाही.

ठिकाण ......................

दिनांक ......................

उमेदवाराची सही.

I certify that the foregoing information is correct and complete to the best of my knowledge and belife, I am not aware of any circumstances which might impair my fitness for employment under Government.

Place ......................

Date ......................

Signature of the Candidate.

# ओळख प्रमाणपत्र / *IDENTITY CERTIFICATE*

खालीलपैकी एका व्यक्तीची या प्रमाणपत्रावर सही असावी--

This certificate is to be signed by any one of the following--

(एक) राज्य किंवा केंद्र शासनाचे राजपत्रित अधिकारी ;
(i) Gazetted Officers of the State or Central Government ;

(दोन) संसद किंवा राज्य विधानमंडळाचे सदस्य ;
(ii) Members of the Parliament or State Legislature ;

(तीन) उपविभागीय दंडाधिकारी / अधिकारी ;
(iii) Sub-Divisional Magistrates / Officers ;

(चार) मामलेदार, तहसीलदार किंवा दंडाधिकाऱ्याच्या शक्ती वापरण्यास प्राधिकृत केलेले नायब / उपतहसीलदार ;
(iv) Mamlatdars, Tahsildars or Naib/Deputy Tahsildars authorised to exercise magisterial powers ;

(पाच) सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे आणि / किंवा माध्यमिक शाळांचे प्राचार्य / मुख्याध्यापक ;
(v) Principals and Head Masters of all recognised Colleges and / or Secondary Shcools ;

(सहा) पोस्ट मास्तर
(vi) Post Masters.

प्रमाणित करण्यात येते की, श्री. .................................................. यांचा / ची मुलगा / मुलगी / पत्नी,
श्री. / श्रीमती / कुमारी .................................................. यांना मी गेली ................ वर्षे .................. महिने
ओळखत आहे आणि माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे त्यांनी दिलेला तपशील बरोबर आहे.

ठिकाण ..........................

(सही) ..................................

दिनांक ..........................

(पदनाम किंवा दर्जा आणि पत्ता)

Certified that I know Shri / Shrimati / Kumari ..........................................................................
son / daughter / wife of shri. ............................................ for the last ................. years ..................... Months
and that to the best of my knowledge and belief particulars furnished by him / her are correct.

Place ..............................

Signature ....................................

Date ..............................

(Designation or Status and address)

---

## (कार्यालयाने भरावयाचे) *( To be filled in by the office )*

(१) नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाव, पदनाम आणि संपूर्ण पत्ता ______________________
(i) Name designation and full address of the appointing authority. ______________________

(२) ज्यासाठी उमेदवाराचा विचार करण्यात येत आहे ते पद ______________________
(ii) Post for which the candidate is being considered ______________________

# मत्ता व दायित्वे प्रमाणपत्र

## प्रपत्र-१
## अचल मालमत्तेचे विवरण

दिनांक ३१ मार्च, २०२६ च्या स्थितीस अनुसरून,

**कर्मचाऱ्याचे नांव -** **पदनाम -**
**संवर्ग -** **सध्याचे मूळ वेतन -**

| अ. क्र. | अशी मालमत्ता जेथे असेल त्या ठिकाणचा पोस्टाचा संपूर्ण पत्ता (जिल्हा/तालुका/ शहर/गांव) | अशा मालमत्तेचे नांव व संपूर्ण तपशील (घर/ बंगला सदनिका, जमिन, याबाबतचा संपूर्ण तपशील व क्षेत्रफळ) | अशा मालमत्तेच्या बांधकामाची/ खरेदीची/ जमिन असल्यास तिच्या खरेदीच्या किंमत (संपादित केल्याचे वर्ष नमूद करावे) | मालमत्तेची सध्याची किंमत | सदर मालमत्ता कोणाच्या नांवे आहे ? स्वत:च्या नावे नसेल तर ज्याच्या/ जिच्या नांवे आहे त्या व्यक्तीशी शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे नाते | सदर मालमत्ता कशी व कोणाकडुन संपादित केली त्याचा तपशील (खरेदी केली. भाडेपट्ट्याने घेतली, गहाणखत करून घेतली, वारसाहक्काने/ भेट किंवा अन्य मार्गाने मिळाली.) | मालमत्तेपासुन मिळणारे मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

वर नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे संपूर्ण सत्य व बिनचूक आहे.

**सही :**
**नांव :**
**पदनाम :**
**कार्यरत ठिकाण :**

टिप :

(१) स्तंभ ५ मध्ये सध्याची अंदाजित किंमत नोंदवावी.

(२) रकाना ७ मध्ये तात्पुरती गहाण किंवा लीजद्वारे मालमत्ता संपादन करण्यात आली असेल ती सुध्दा विचारात घ्यावी. ती लीजद्वारे (भाडेपट्टीद्वारे) संपादन करण्यात आली असेल तर तिचे एकूण वार्षिक भाडे आणि जर वारसा, भेट किंवा अदलाबदल करून ती संपादन करण्यात आली असेल तर संपादन केलेल्या मालमत्तेचे अंदाजे मूल्य नमूद करावे.

(३) हे प्रपत्र प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.

# मत्ता व दायित्वे प्रमाणपत्र

## प्रपत्र-२
## चल मालमत्तेचे विवरण

दिनांक ३१ मार्च, २०२६ च्या स्थितीस अनुसरून,

**कर्मचाऱ्याचे नांव** -  **पदनाम** -

**संवर्ग** -  **सध्याचे मूळ वेतन** -

| अ. क्र. | चल मालमत्तेचे वर्णन | चल मालमत्तेचा संपूर्ण तपशील (बँक/पोस्ट ऑफिस, इत्यादींचे पत्त्यांसह) | खात्यावर असलेली रक्कम / रोकड सुलभ मत्तेची दर्शनी मूल्य / विमा पॉलिसीद्वारे आश्वासित रक्कम / जडजवाहिर, चांदी किंवा अन्य मौल्यवान धातू, रत्ने व इतर जंगम मालमत्ता संपादन केली त्यावेळचे मूल्य / किंमत | स्वत:च्या नांवे नसेल तर ज्या व्यक्तीच्या नांवावर आहे त्याचे शासकीय कर्मचाऱ्याशी नाते. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

वर नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे संपूर्ण सत्य व बिनचूक आहे.

**सही :**

**नांव :**

**पदनाम :**

**कार्यरत ठिकाण :**

टिप :

(१) सदर प्रपत्रात खालील बाबींचा समावेश असावा.

(अ) सर्व रोकड सुलभ मत्ता, जसे रोकड, सर्व प्रकारची बँक खाती, आवर्त ठेव खाती, मुदतबंद ठेवी, कॅश सर्टिफिकेट्स, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी खाती, पोस्ट ऑफिस बचत खाती, पोस्ट ऑफिस मुदतबंद ठेवीची खाती, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, सामाजिक सुरक्षा प्रमाणपत्रे, मुदतीच्या आवर्त ठेवी, शेअर्स, कर्जरोखे, कर्जे इत्यादी सर्व प्रकरणी ठेवींची रक्कम, मूल्य, दर्शनी मूल्य इत्यादी माहिती नमूद करावी.

(आ) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी / अंशदायी भविष्य निर्वाह निधी, जीवन विमा पॉलिसी, पोस्टल विमा पॉलिसी, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतील व अंशदायी भविष्य निर्वाह निधीतील जमा रक्कम व प्रत्येक विमा पॉलिसीद्वारे आश्वासित असलेली रक्कम दर्शविण्यात यावी.

(इ) जडजवाहिर (एकूण मूल्य दर्शवावे)

(ई) चांदी व इतर बहुमोल धातू व जडजवहिरात मोडत नसलेली मौल्यावन रत्ने (सर्वांचे एकूण मूल्य) आणि,

(उ) इतर चल मालमत्ता जसे की, मोटारगाड्या, स्कूटर्स / मोटारसायकल, रेफ्रिजीरेटर, एअर कंडिशनर, रेडिओ/रेडिओग्राम/टी.व्ही. सेट (दूरचित्रवाणी संच) ज्यांची किंमत प्रत्येक प्रकरणी मूळ वेतनाच्या दुपटीपेक्षा जास्त आहे अशा इतर वस्तू (रोजच्या वापरातील कपडे, भांडी, पुस्तके, काच समान इत्यादी वस्तू वगळुन) प्रत्येक वस्तुचे वेगवेगळे मूल्य दर्शविण्यात यावे.

(२) वरील टीप (१)(अ) मध्ये दर्शविलेल्या रोकड सुलभ मत्तेबाबत व टीप (१) (अ) मध्ये दर्शविलेल्या भविष्य निर्वाह निधी / अंशदायी भविष्य निर्वाह निधी आणि विमापत्रे (इन्शुरन्स पॉलिसीज) बाबतचे वर्णन स्तंभ २ मध्ये नमूद करावे. (बँकेचे नांव, पत्ता, पोस्ट ऑफिसचा पत्ता, युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या शाखेचा पत्ता, कंपनी/फर्म/ऋणको यांचे पत्ते) इ. पूर्ण तपशील स्तंभ ३ मध्ये नमूद करण्यात यावा.

(३) भाडे खरेदी तत्वावर व हप्तेबंदीवर घेतलेल्या वस्तुंच्या पोटी हे विवरण सादर करण्याच्या दिनाकांपर्यंत भरलेली रक्कम नमूद करावी.

(४) हे प्रपत्र प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.

# मत्ता व दायित्वे प्रमाणपत्र

## प्रपत्र-३
## दायित्वांचे विवरण

दिनांक ३१ मार्च, २०२६ च्या स्थितीस अनुसरून,

**कर्मचाऱ्याचे नांव** -
**पदनाम** -
**संवर्ग** -
**सध्याचे मूळ वेतन** -

| अ. क्र. | रक्कम | धनकोचे नांव व पत्ता | दायित्व पत्कारल्याचा दिनांक | व्यवहाराचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

वर नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे संपूर्ण सत्य व बिनचूक आहे.

**सही :**
**नांव :**
**पदनाम :**
**कार्यरत ठिकाण :**

टिप :

(१) दोन महिन्यांच्या मूळ वेतनाच्या रकमेपेक्षा अधिक नसणारी प्रत्येक कर्जाची रक्कम नमूद करण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) या विवरणपत्रात वाहन खरेदीसाठी अग्रीम, घरबांधणीसाठी अग्रीम, (वेतन अग्रीम आणि प्रवास भत्त्यांचे अग्रीम, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतून घेण्यात आलेली अग्रीमे आणि विमापत्रावर आणि कायम ठेवीवर काढलेले अग्रीम या व्यतिरिक्त) इत्यादी सारख्या शासकीय कर्मचाऱ्याने घेतलेल्या कर्जांच्या अग्रिमांचाही अंतर्भाव करावा.

३) हे प्रपत्र प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.

*****